# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२५/प्र.क्र.०८/बीसीए/अतिरिक्त सीईटी/२०२५/२०८६ दिनांक - ११.०६.२०२५

## एमएएच-बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम-(अतिरिक्त सीईटी)-२०२५ ऑनलाईन अर्ज नोंदणी

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता तंत्रशिक्षण विभागातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम-सीईटी-२०२५ ही ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत घेण्यात आलेली असून त्याचा निकाल दिनांक ०४ जून, २०२५ रोजी घोषित करण्यात आलेला आहे.

सदरील परीक्षेस काही उमेदवार सहभागी होऊ न शकल्यामुळे उमेदवार/ पालक/ संस्था यांनी सीईटी कक्षास व्यक्तीशः भेट देवून, ई-मेलद्वारे त्याचप्रमाणे दूरध्वनीद्वारे अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याबाबत सीईटी कक्षास तसेच शासनास विनंती करण्यात आलेली होती. संबंधीत उमेदवारांचे शैक्षणिक हिताचा विचार करुन बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याचे शासनाने मान्यता दिली आहे.

**सदर अतिरिक्त सामाईक प्रवेश परीक्षेसाठी पुढील प्रमाणे उमेदवार पात्र असतील.**

१. ज्या उमेदवारांनी दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत सदर परीक्षा देवू शकले नाहीत अशा इच्छुक उमेदवारांना अतिरिक्त परीक्षेची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. तसेच ज्या उमेदवारांनी दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत परीक्षा दिलेली आहे अशा इच्छुक उमेदवारांना देखील अतिरिक्त परीक्षेची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. ज्या उमेदवारांनी दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत परीक्षा दिल्यानंतर अतिरिक्त परीक्षेची संधी स्वीकारली आहे अशा उमेदवारांचे दोन्ही परीक्षांपैकी सर्वात्तम असणारे पर्सेंटाईल प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येईल. यासाठी उमेदवारांनी सर्वोत्तम पर्सेंटाईलची गुणपत्रिका संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे आवश्यक राहील.

४. दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेच्या धर्तीवर अतिरिक्त प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

५. दिनांक २९ एप्रिल, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत परीक्षेचा निकाल पर्सेंटाईल पद्धतीने घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार अतिरिक्त परीक्षेची निकाल प्रक्रिया देखील पर्सेंटाईल पद्धतीने करण्यात येईल.

एमएएच-बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम-(अतिरिक्त सीईटी)-२०२५ च्या ऑनलाईन अर्ज नोंदणीसाठीचा कालावधी पुढील प्रमाणे -

| अ. क्र. | सामाईक प्रवेश परीक्षेचे नाव | तपशील | नोंदणी कालावधी | सामाईक प्रवेश परीक्षेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | महा-बीसीए/बीबीए/ बीएमएस/बीबीएम-(अतिरिक्त सीईटी)-२०२५ | संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणी व निश्चिती करणे | १२/०६/२०२५ ते २०/०६/२०२५ | तारीख निर्धारित वेळेत जाहीर केली जाईल |

सदर परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई